लोकसत्ता पु.पा.१.



# उड्डाणपुलावरील लोखंडी कमान कोसळली

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** नायगाव पूर्व-पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाणपुलावर लावण्यात आलेली उंचीमर्यादा लोखंडी कमान वाहनाच्या धडकेत तुटली आहे. रविवारी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली. घटनेची ही तिसरी वेळ आहे.

नायगाव पूर्व व पश्चिमेचा परिसर शहराला जोडण्यासाठी उड्डाणपूल तयार करण्यात आला आहे. पूल केवळ हलक्या वाहनांच्या वाहतुकीसाठी असून अवजड वाहने या पुलावरून जाऊ नयेत यासाठी पुलाच्या पूर्व व पश्चिम अशा दोन्ही बाजूंनी लोखंडी उंचीमर्यादा दर्शवणाऱ्या कमानी बसविण्यात आल्या आहेत. रविवारी रात्री नायगाव पूर्वेच्या बाजूला असलेल्या कमानीला वाहनाची धडक लागून ती खाली कोसळली. त्यामुळे काही काळ येथील वाहतुकीवर परिणाम झाला होता. घटना घडली तेव्हा कोणत्याच वाहनांची वाहतूक नसल्याने दुर्घटना टळली आहे.

## विक्रेत्याची हत्या

**भाईंदर :** मिरा रोड येथे एका भाजी विक्रेत्याची हत्या करण्यात आली आहे. मोहम्मद यार (२३) असे विक्रेत्याचे नाव आहे.

नया नगर येथे मोहम्मद यार हा रस्त्यावर भाजी विक्रीचा व्यवसाय करत होता. याच परिसरात ऑर्चिड अपार्टमेंटजवळ तो मित्रांसोबत दुकानात राहत होता. शनिवारी रात्री सातच्या सुमारास इमारतीच्या सामूहिक शौचालयामध्ये त्याचा मृतदेह आढळला. गळा चिरून त्याची हत्या करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या प्रकरणी नया नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोकसत्ता पु.पा.४.

## उत्तराखंडातील मतदारांसाठी पुष्कर धामी वसईत

**वसई :** वसई आणि नालासोपारा मतदारसंघात असेलल्या उत्तराखंडातील हजारो मतदारांना साद घालण्यासाठी उत्तराखंडाचे मुख्यमंत्री पुष्पक धामी यांनी वसईत सभा घेतली. यावेळी महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

गेल्या काही वर्षांपासून वसई-विरार शहरात उत्तराखंड राज्यातील नागरिक मोठ्या संख्येने वास्तव्य करू लागले आहेत. विविध क्षेत्रात ते सक्रीय आहेत. वसई आणि नालासोपारा मतदारसंघात उत्तराखंड राज्यातील सुमारे ४० हजारांहून अधिक मतदार आहेत. या मतदारांना आपल्याकडे खेचण्यासाठी उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर धामी यांनी वसईत सभा घेतली. नरेंद्र मोदी यांच्या सरकाने केलेली विकास कामे आणि देशाचा होणार विकास त्यांनी सांगितला.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पा.नं. II

लोकमत पु.पा.१

# नरेंद्र मोदींनी भ्रष्टाचारमुक्त व्यवस्था निर्माण केली!

## केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भ्रष्टाचारमुक्त व्यवस्था तयार केली. त्याद्वारे त्यांनी नागरिकांच्या करांच्या पैशांचा सदुपयोग केला, असे प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी सोमवारी भाईंदर येथे व्यावसायिकांच्या सभेत केले.

भाजपचे उमेदवार नरेंद्र मेहता यांनी या सभेचे आयोजन केले होते. यावेळी गोयल म्हणाले की, तुम्ही मेहनत करून दिलेला कर पूर्वी भ्रष्टाचारात जात होता. पण, मोदी सरकार इमानदारीने तुमच्या कराचा सदुपयोग करत आहेत. तुम्ही तुमच्या मेहनतीचा पैसा सरकारकडे देता. त्यातून गरिबांना विविध सुविधा आणि योजनांचा लाभ दिला जात आहे.

मोदींनी भ्रष्टाचारमुक्त व्यवस्था तयार केल्यामुळे देशात १० वर्षांत मोठमोठी कामे झाली आहेत. ८० कोटी लोकांना मोफत धान्य पुरवठा, ५५ कोटींची आयुष्मान योजना, १२ कोटी घरात मोफत शौचालयांसाठी, ४ कोटी लोकांना घरे, मुद्रा योजनेचा ५३ कोटी लोकांना लाभ आणि ४४ कोटी लोकांना कर्ज, त्यातील ५५ टक्के कर्ज महिलांना आदी कामे गेल्या दहा वर्षांत करण्यात आली, असेही गोयल यांनी सांगितले.



### ५० कोटींहून अधिक जनधन खाती

गेल्या दहा वर्षांत ५० कोटींपेक्षा जास्त जनधन खाती उघडण्यात आली. सर्व योजना विनाभ्रष्टाचार सर्वांपर्यंत पोहोचत आहेत, असे गोयल म्हणाले. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या तत्कालीन महाविकास आघाडी सरकारवर टीका करत त्यांच्या काळात सर्व योजना ठप्प झाल्या होत्या, असा आरोप केला.

# आ. गीता जैन यांचा पोलिस ठाण्यात ठिय्या

लोकमत न्यूज नेटवर्क


**मीरा रोड :** पोलिसांनी आपल्या छायाचित्रकारास नियमबाह्य ताब्यात घेऊन खासगी गाडीतून पोलिस ठाण्यात नेऊन धमकावल्याप्रकरणी अपक्ष उमेदवार गीता जैन यांनी सोमवारी नवघर पोलिस ठाण्यात ठिय्या आंदोलन केले. पोलिस गुंडगिरी करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

भाजपचे उमेदवार नरेंद्र मेहता यांच्या फिर्यादीवरून नवघर पोलिसांनी फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर मेहतांचे काही खासगी फोटो मॉर्फ करून पोस्ट व्हायरल केली म्हणून एका समाजमाध्यम वापरकर्त्यावर १० नोव्हेंबरला गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी खात्याशी जोडलेला मोबाइल क्रमांक तपासला असता तो आ. जैन यांचा छायाचित्रकार हर्ष शाह याचा असल्याचे निष्पन्न झाल्याने साध्या वेशातील ४-५ पोलिसांनी शाह याला ताब्यात घेतले होते.

हर्ष शाह याला ताब्यात घेतल्याची माहिती त्याच्या घरच्यांना दिली होती. पोलिस ठाण्यात आणून त्याला नोटीस देण्यात आली. त्यानंतर त्याला सोडले.

- धीरज कोळी, वरिष्ठ पोलिस निरीक्षक

# घरगुती कारणाने आत्महत्या



**नालासोपारा :** विरारच्या ग्लोबल सिटीतील एव्हरशाइन एव्हेन्यू या इमारतीत राहणारे अरुण कुमार (४६) यांनी घरगुती कारणातून आत्महत्या केली आहे. त्यांचे पत्नीसोबत घरगुती कारणावरून नेहमी वाद होत होते. त्यांची पत्नी भाचीच्या घरी निघून गेली होती. शनिवारी रात्री त्यांनी राहत्या घरी पंख्याला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. बोळींज पोलिसांनी रविवारी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# अपघातात तरुणाचा मृत्यू



**नालासोपारा :** ढेकाळे गावातील जायशेत बहिरीकोंडा येथे राहणारा नितीन भोये (१८) आणि उमेश भोये (२४) हे दोघे जण शनिवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास दुचाकीने सातीवली येथील खाजगी कंपनीत नोकरीसाठी गेले. कामावरून सुटल्यावर दोघे रात्री साडेआठ वाजता दुचाकीने घरी जात असताना मुंबई- अहमदाबाद महामार्गावरील भालीवली गावाजवळ समोरून विरुद्ध दिशेने येणाऱ्या कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात नितीन याचा मृत्यू झाला, तर उमेश गंभीर जखमी झाला आहे. मांडवी पोलिसांनी अपघाताची माहिती न देता पळून गेलेल्या आरोपी कार चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पु.पा.१.



कळंब येथे गावठी हातभट्टीची दारू तयार करणाऱ्या अड्ड्यावर गुन्हे शाखा युनिट-३ च्या पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली.

# हातभट्टीची दारू तयार करणाऱ्या अड्ड्यावर छापा

## गुन्हे शाखा-३ च्या पोलिसांची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** गावठी हातभट्टीची दारू तयार करणाऱ्या अड्ड्यावर गुन्हे शाखा युनिट-३ च्या पोलिसांनी छापा टाकून लाखोंचा मुद्देमाल नष्ट केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी, सपोनि शिवकुमार गायकवाड यांनी दिली आहे.

कळंब गावातील वासुदेव बुवा नगर येथील राजेंद्र यशवंत किणी यांच्या शेतात शेडमध्ये गैरकायदेशीर गावठी हातभट्टीची दारू तयार होत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. तेथे सोमवारी सकाळी छापा टाकून कारवाई करण्यात आली. यावेळी ५ हजार लिटर नवसागर गूळमिश्रित रसायन, २८० लिटर गावठी हातभट्टीची दारू व दारू तयार करण्याची साधने असा एकूण २ लाख ४१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल आढळला.

गुन्हे शाखेचे पोलिस अंमलदार मुकेश तटकरे यांनी राजेंद्र किणी (वय ५८) यांच्याविरोधात अर्नाळा पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

### यांनी केली कारवाई

गावठी अड्ड्यावर कारवाई पोलिस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट तीनचे पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख, सपोनि सोपान पाटील, पोलिस उपनिरीक्षक उमेश भागवत, ज्ञानेश्वर आव्हाड, पोलिस हवालदार मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, राकेश पवार, युवराज वाघमोडे, सुनील पाटील, अतिष पवार, मनोहर तारडे, तुषार दळवी, मसुब प्रवीण वानखेडे यांनी केली आहे.

पुढारी पु.पा.३.

# वसईत अमली पदार्थ जप्त

**खानिवडे :** मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय परिसरात अंमली पदार्थ विक्री व तस्करी करणा-या दोन जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून साडे तेरा किलो वजनाचा अंमली पदार्थ जप्त करून ही तस्करी करताना वापरात आलेल्या कारसह आठ लाखांचा मुद्धेमाल गुन्हे शाखा कक्ष - ३ च्या पोलिसांनी हस्तगत केला आहे मीरा भाईंदर वसई विरार गुन्हे शाखा कक्ष-३ विरार चे पोलीस अधिकारी व अंमलदार हे ९ नोव्हेंबर रोजी महामार्गावर गस्त घालत असताना महामार्गावरील शिवाचा पाडा येथे बंद अवस्थेत असलेल्या पेट्रोलपंपा जवळ एका संशयित कारची झडती घेतली . तेव्हा त्यामध्ये अमली पदार्थ सापडून आला .याबाबत कारमधील संतोष जैसवार (२६) विकास झिजुटें (२२)दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्या विरुद्ध पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

Scanned with OKEN Scanner

पुढारी पु.पा.१.

# काशिमिरात श्वानाच्या मृत्यूप्रकरणी टँकरचालकावर गुन्हा दाखल

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

काशिमीरा परिसरात टँकर चालकाने श्वानाच्या अंगावर टँकर घातल्याने श्वानाच्या मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेप्रकरणी टँकर चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काशीमीरा पोलीस ठाणे हद्दीतील डीबी ओझन बी. क्र.३ येथे पाणी देण्यासाठी टँकर येत असताना टँकर चालकाने हयगयीने वाहन चालवल्याने एका श्वानाचा हकनाक बळी गेला. सोसायटीत झोपलेल्या श्वानाच्या अंगावर टँकरचालकाने थेट टँकर घातल्यामुळे श्वानाचा मृत्यू झाल्याची घटना घडली.

दरम्यान या घटनेप्रकरणी काशीमीरा पोलीस ठाण्यामध्ये या टँकर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काशीमीरा परिसरातील ठाकूर मॉल जवळ असणाऱ्या सोसायटी काशिमिरा येथे वॉटर सप्लाय करणारा टँकर चालक हा पाणी देण्यासाठी येत असताना इमारतीखाली श्वान झोपलेला असताना त्याने थेट टँकर त्याच्या अंगावर घातल्यामुळे श्वानाचा मृत्यू झाला.

त्यावेळी श्वानास कोणत्याही प्रकारचा हॉर्न न देता, आवाज न देता, त्याला झोपेतून उठवून त्याला बाजूला जाऊ देण्याची वाट न पाहता टँकर चालकाने त्याच्या अंगावरून पाण्याचा टँकर घातला.

या घटने दरम्यान टँकरचा पुढच्या बाजूचे चाक श्वानाच्या अंगावरून गेल्याने वॉटर सप्लाय करणारा टँकर चालक हा श्वानाच्या मृत्यूस जबाबदार ठरला आहे.

त्यामुळे येथील फिर्यादी जुही दिनेश कुर्तडकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार टँकर चालकाविरुद्ध काशिमीरा पोलीस ठाण्यामध्ये भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३२५, प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियमासह, महाराष्ट्र मोटार वाहन नियमा अंतर्गत रविवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार अक्षय पाटील हे करत आहेत.

पुढारी पा.नं.२.

# नायगाव-चंडिका देवी मंदिराची लिफ्ट कोसळली

**वसई :** नायगाव-जूचंद्र येथील चंडिका देवी मंदिराची लिफ्ट कोसळल्यामुळे ३ भक्त जखमी झाल्याची घटना सोमवारी सकाळी घडली. जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

ठाण्याहून ९ भक्त चंडिका मातेच्या दर्शनासाठी नायगाव-जूचंद्र येथील चंडिका देवीच्या दर्शनासाठी गेले होते. सकाळी ११ वाजता मंदिराच्या परिसरात पोहोचल्यानंतर त्यातील सहाजण लिफ्टने मंदिराच्या गाभाऱ्याकडे निघाले होते. त्यावेळी लिफ्ट कोसळली आणि त्यातील सुषमा सिंग, प्रमोद सिंग, नितीसा सिंग असे तीन भक्त जखमी झाले, तर इतर भक्त किरकोळ जखमी झाले. ही घटना कळल्यावर मंदिर प्रशासनाने तातडीने गंभीर जखमींना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले. मंदिर प्रशासनाने लिफ्टची योग्य देखभाल व दुरुस्ती न केल्यामुळे हा अपघात घडल्याचा आरोप जखमी सुषमा सिंह यांचे पती महेशलाल सिंह यांनी केला आहे. या प्रकरणी पोलिसांचा तपास सुरू आहे. दरम्यान, सोमवारी सकाळी चंडिका देवी मंदिरात ही घटना घडली, त्यात तीन जण जखमी झाल्याची माहिती आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत, अशी माहिती नायगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बलराम पालकर यांनी दिली.

Scanned with OKEN Scanner

दैनिक भास्कर पा.नं. ३.

# आरोपी को छुड़ाने निर्दलीय उम्मीदवार गीता जैन का पुलिस स्टेशन में हंगामा

**▪ सोशल मीडिया पर भाजपा उम्मीदवार का एडिट वीडियो किया था पोस्ट**

भास्कर संवाददाता | भायंदर

मीरा-भायंदर विधानसभा क्षेत्र के उम्मीदवारों से जुड़ा झूठा, भ्रामक और मॉर्फ्ड( एडिट) कंटेंट पोस्ट करने का क्रम जारी है। ताजा मामले में भाजपा उम्मीदवार नरेंद्र मेहता का एडिट निजी फोटो और वीडियो एक इंस्टाग्राम पेज पर पोस्ट करने वाला व्यक्ति निर्दलीय प्रत्याशी गीता जैन का समर्थक निकला। पुलिस ने उसे हिरासत में लिया, तो जैन ने पुलिस स्टेशन पहुंचकर हंगामा शुरू कर दिया। अंततः पुलिस ने कानूनी प्रक्रिया पूरी कर आरोपी हर्ष शाह को छोड़ दिया। हाल ही में कांग्रेस प्रत्याशी मुजफ्फर हुसैन को बदनाम करने वाला पत्र वायरल करने के आरोप में भाजपा कार्यकर्ताओं के खिलाफ मामला दर्ज हुआ था।

बता दें कि कुछ दिन पहले फेसबुक पर भाजपा प्रवक्ता भावना तिवाड़ी के चरित्र हनन करने वाला कमेंट राजू गोयल नाम के शख्स ने किया गया था। इससे गुस्साई तिवाड़ी पुलिस स्टेशन में ही आरोपी को चप्पल से पीट दिया। उन पर गोयल के ऑफिस ब्याय की पिटाई का आरोप है।

बाद में उनके खिलाफ भी पुलिस कार्रवाई हुई। राजू गोयल को गीता जैन ने अपना कार्यकर्ता बताया और उसे निर्दोष मानते हुए उसकी गलतियों का समर्थन किया। ताजा मामले में नरेंद्र मेहता के खिलाफ में माय मीरा-भायंदर चैनल नाम के इंस्टाग्राम पेज पर नरेंद्र मेहता का मॉर्फ्ड (एडिट) फोटो पोस्ट किया गया था।



### जैन ने सीधे डीजीपी को फोन किया

पीआई धीरज कोली ने कहा कि मेटा से जांच कराई गई, जिसके बाद आरोपी हर्ष शाह का नाम सामने आया। आरोपी को पुलिस ने जैन की ऑफिस के बाहर से हिरासत में लिया। इसकी जानकारी होने पर विधायक गीता जैन सीधे डीजीपी से फोन कर उनके कार्यकर्ता का अपहरण कर लिए जाने की जानकारी दे दी।

**भाजपा उम्मीदवार के इशारे ये सब हुआ- जैन:** पीआई कोली ने बताया कि जैन ने डीजीपी से फोन बात करने के बाद समर्थकों को साथ लेकर नवघर पुलिस स्टेशन पहुंच गईं और आरोपी को छोड़ने की मांग को लेकर हंगामा शुरू कर दिया। उनका आरोप था कि नोटिस आदि कानूनी प्रक्रिया पूरी किए बिना ही उनके कार्यकर्ता को उठाया गया है। ऐसा भाजपा उम्मीदवार के इशारे पर पुलिस ने किया है।

# 280 लीटर देसी शराब बरामद, एक गिरफ्तार

भास्कर न्यूज | विरार

नालासोपारा (पश्चिम) एक खेत में देसी शराब बनाने की सूचना मिलने पर क्राइम ब्रांच यूनिट-3 की टीम ने सर्च ऑपरेशन चलाया। इस अभियान में टीम को बड़ी सफलता मिली, जब उन्होंने शराब बनाने के उपकरण सहित 280 लीटर देशी शराब बरामद की। पुलिस ने एक आरोपी गिरफ्तार किया है। आरोपी का नाम राजेंद्र किणी है। पुलिस के मुताबिक, कलंब गांव में कई दिनों से देसी शराब बनाने की सूचना मिल रही थी। सूचना के आधार क्राइम ब्रांच की टीम ने सोमवार सुबह छापा मारा। पुलिस ने 280 लीटर देसी शराब बरामद की और हजारों लीटर लहन को नष्ट कर दिया।



# मुंबई-अहमदाबाद राजमार्ग पर दो मादक पदार्थ तस्कर गिरफ्तार



भास्कर न्यूज | विरार. वसई-विरार शहर में मादक पदार्थ की तस्करी करनेवाले दो आरोपियों को क्राइम ब्रांच यूनिट-3 ने गिरफ्तार किया है। तस्करों के पास से साढ़े 13 किलो गांजा बरामद किया गया है। आरोपी की पहचान संतोष जैसवाल, विकास झिंजुटे के रूप हुई है। पुलिस के मुताबिक, मुंबई- अहमदाबाद राजमार्ग पर क्राइम ब्रांच टीम गश्त कर रही थी। इस दौरान शिवाचापाडा, सायली पेट्रोल पंप के पास एक संदिग्ध कार दिखाई दी। पुलिस ने जब कार की तलाशी ली तो आठ लाख 72 हजार 760 रुपए का गांजा बरामद हुआ। पुलिस ने बताया कि दोनों आरोपी मानखुर्द के रहने वाले हैं। पुलिस मामला दर्ज कर जांच में जुट गई है।

Scanned with OKEN Scanner

नवभारत पृ.पा.४.

आरोप | निवर्तमान विधायक गीता जैन ने पुलिस से कहा, मुझे ही गिरफ्तार कर लो

# पुलिस ने फिल्मी अंदाज में फोटोग्राफर को उठाया

भाईंदर (सं). नवघर पुलिस ने निर्दलीय प्रत्याशी व विधायक गीता जैन के निजी फोटोग्राफर हर्ष शाह को सोमवार की सुबह उनके कार्यालय के बाहर से उठा ले गई. हर्ष पर आरोप है कि उसने पूर्व विधायक और भाजपा प्रत्याशी नरेंद्र मेहता की कोई विवादित तथा मॉर्फ की हुई वीडियो सोशल मीडिया पर शेयर किया था. विधायक जैन ने कहा कि उनके कार्यालय के सामने से 4 लोग प्राइवेट वाहन में हर्ष को उठा कर ले गए. सीसीटीवी फुटेज देखने से लगा कि उसका किडनैप कर लिया गया है. डीसीपी को फोन कर पूछने पर उन्हें पता चला कि पुलिस ने उसे पूछताछ के लिए लाया है.



## बदनामी करने वाले की खुली पोल

हालांकि अपनी प्रतिक्रिया में नरेंद्र मेहता ने कहा कि उन्होंने पुलिस को पत्र दिया था कि कोई सोशल मीडिया में उनकी बदनामी कर रहा है, पुलिस ने इसकी जांच कर फोटोग्राफर हर्ष को हिरासत में लिया. पुलिस ने अपना काम किया और कौन उनकी बदनामी कर रहा इसकी पोल खुल गई.

## जैन का आरोप, दबाव में कार्य कर रही पुलिस

जैन ने आरोप लगाया कि पुलिस दवाब में कार्य कर रही है, बिना नोटिस दिए इस तरह से उनके फोटोग्राफर को ले जाना ठीक नहीं. यह वर्दी की गुंडागर्दी है. जैन ने नवघर पुलिस थाने की सीढ़ी पर बैठ गई और मेहता पर आरोप लगाते हुए कहा कि मेहता अपनी पराजय की डर से उनके कार्यकर्ताओं को डरा रहे , धमका रहे और प्रताड़ित कर रहे हैं. उनको इतना ही डर है तो मुझे ही गिरफ्तार करवा दें. हालांकि डीसीपी प्रकाश गायकवाड़ ने कहा कि हर्ष को पूछताछ और जांच के लिए हिरासत में लिया था, और बाद में छोड़ दिया गया.

## हुसैन के संबंध में भी वायरल हुई वीडियो

- इससे पूर्व बम ब्लास्ट के आरोपी याकूब मेमन की फर्जी दया याचिका पर कांग्रेस के उम्मीदवार मुजफ्फर हुसैन के हस्ताक्षर होने का दावा करते हुए पोस्ट वायरल की गई थी. इस प्रकरण में 3 लोगों के अलावा दो सोशल मीडिया पेज के खिलाफ हुसैन की शिकायत पर नयानगर पुलिस थाने में एफआईआर दर्ज की गई थी.
- हैरानी की बात है कि उन आरोपियों को अब तक गिरफ्तार नहीं किया गया है. फोटोग्राफर हर्ष के खिलाफ पुलिस कार्रवाई में तत्परता पर आश्चर्य व्यक्त किया जा रहा है.

नवभारत पृ.पा.२.

# लाखों का गांजा जब्त, 2 अरेस्ट



नालासोपारा, (सं). मीरा भायंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत आने वाले अपराध शाखा -3 की विरार टीम ने महामार्ग पर एक कार से लाखों रुपये के गांजा संग दो तस्करों को गिरफ्तार किया है. उक्त कार्रवाई पुलिस आयुक्त मधुकर पांडेय, अपर पुलिस आयुक्त दत्तात्रय शिंदे के मार्गदर्शन में पुलिस उपायुक्त अविनाश अंबुरे, मदन बल्लाल , प्रमोद बडाख के नेतृत्व में गठित की गई पुलिस टीम ने वसई पूर्व के शिवाचा पाडा स्थित मुंबई अहमदाबाद मार्ग पर सायली पेट्रोल पम्प के समीप गश्त के बीच की गई तलाशी के दौरान एक कार से 13 किलो 5 सौ ग्राम गांजा जब्त किया हैं. जब्त किए गए माल की कुल क़ीमत 8 लाख 72 हजार 760 रुपये आँकी गई हैं. उक्त मामले में पुलिस ने संतोष रामजीत जैसवार (26) और विकास धनंजय झींजूटे (22) नामक दोनों तस्करों को गिरफ्तार कर लिया है. पुलिस ने गिरफ्तार दोनों तस्करों के खिलाफ विभिन्न धाराओं के तहत मामला दर्ज कर आगे की कार्रवाई में जुटी हैं.

Scanned with OKEN Scanner

The Free Press Journal

## Man arrested with pistol in Nallasopara

**Suresh Golani**
MIRA BHAYANDAR

The crime detection unit of the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police arrested a 24-year-old man with a country-made pistol and live cartridge on Saturday. Acting on a tip-off, the personnel from the detection unit nabbed Rudresh Santosh Savet from the ground behind Naleshwar Nagar in the Tulinj area of Nallasopara East.

With the latest addition, the police have seized 14 country-made pistols, 30 live cartridges collectively valued at around Rs6 lakh and arrested ten people including gun runners and potential buyers in the past less than ten days.

This action is in addition to apprehending two blacksmiths (metal workers) who were found to be in possession of 45 swords in Kashimira a week before the imposition of the MCC.

While all the accused have been booked under the relevant sections of the Arms Act and Maharashtra Police Act, investigations were underway to identify links to the seized weapons involved in the illegal possession and trafficking of firearms and weapons.

## Ganja worth ₹8.72L seized; two arrested

**Suresh Golani**
MIRA-BHAYANDAR

The crime branch unit (zone 3) attached to the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police has arrested two alleged drug peddlers for possessing ganja (cannabis) worth more than Rs8.72 lakh.

Acting on a tip-off, a team led by Inspector Pramod Badhaakh laid a trap and intercepted a car near a defunct petrol pump in Vasai on Saturday evening. The vehicle's checking led to the discovery of the contraband weighing 13.5 kg. Both the car occupants, Santosh Jaiswar, 26, and Vikas Jinjute, 22, who are residents of Mankhurd, were taken into custody and the four-wheeler was seized. The duo has been booked under the Narcotic Drugs and Psychotropic Substances Act. The investigators are trying to ascertain the source of the consignment and the potential buyers.

Scanned with OKEN Scanner